# सामाजिक परिवर्तनात वैचारिक भूमिका महत्त्वाची

## शशिकांत राजोबा; राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

कोल्हापूर, ता. ९ : सामाजिक परिवर्तनात वैचारिक भूमिका महत्त्वाची असते. आचार्य शांतिसागर महाराजांनी ही परंपरा निर्माण केली, असे मत वीर सेवा दलाच्या मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष अध्यक्ष शशिकांत राजोबा यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनातर्फे आयोजित 'आचार्य श्री. शांतिसागर महाराज : मानवतेचे दीपस्तंभ' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या सांगता कार्यक्रमात आज ते बोलत होते.

श्री. राजोबा म्हणाले, "महाराष्ट्र ही संतांची भूमिका असून शिवाजी विद्यापीठाने नेहमीच महावीर अध्यासन केंद्राबरोबरच भगवान महावीरांच्या विचारांना प्राधान्य दिले आहे. अध्यासन केंद्राच्या भविष्यकालीन विस्तारासाठीही विद्यापीठाचे नक्कीच सहकार्य मिळेल."

चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी आज 'दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे जीवन चरित्र' या विषयावर दक्षिण भारत जैन सभेचे ज्येष्ठ सल्लागार प्रा. डी. ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. महावीर अक्कोळे यांनी 'शांतिसागर महाराज तपःसाधना' या विषयावर मनोगत व्यक्त केले. डॉ. पुरंधर चौगुले यांनी 'सल्लेखना महामहोत्सव' या विषयावर मार्गदर्शन केले. 'शांतिसागर महाराज पदविहार एक सामाजिक, आध्यात्मिक परिवर्तन' या विषयावर डॉ. पद्मजा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. समन्वयक प्रा. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले.

# इंजिनिअरिंग, फार्मसी प्रवेश प्रक्रिया सुरू

## प्रवेशाच्या दोन फेऱ्या; १५ डिसेंबरअखेर मुदत; २८ रोजी पहिली यादी

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ९ : राज्य सामायिक प्रवेश कक्षातर्फे अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग ) व औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया आजपासून ऑनलाईन सुरू झाली. पॉलिटेक्निकप्रमाणे पदवीच्याही प्रवेशाच्या यंदा दोनच फेऱ्या होणार आहेत. कोरोनामुळे यंदा प्रवेशप्रक्रिया लांबल्याचा हा परिणाम आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी दोन फेऱ्या कमी झाल्या आहेत. १५ डिसेंबरअखेर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करण्याची मुदत आहे. अठरा डिसेंबरला कच्ची गुणवत्ता यादी प्रसिध्द होईल. यावर वीस डिसेंबर अखेर हरकत घेण्याची मुदत आहे. २२ डिसेंबरला पक्की गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. अठ्ठावीस डिसेंबरला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची पहिली यादी लागेल.

इंजिनिअरिंग, फार्मसी केंद्रीय पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. कोरोनामुळे सीईटीची परीक्षा उशिरा झाल्याने तब्बल चार महिने उशिरा प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. ऑनलाईन पद्धतीने http://fe२०.mahacet.org या संकेतस्थळावर अर्ज करायचे आहेत. खुल्या प्रवर्गासाठी ८०० तर मागासवर्गीयासाठी ६०० रुपये प्रवेश शुल्क आहे. त्यासाठी १५ डिसेंबरअखेर अर्ज सादर करण्याची मुदत आहे. याच कालावधीत मूळ कागदपत्रांची पडताळणी करून घ्यायची आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच आंभियांत्रिकी महाविद्यालये अर्ज सुविधा केंद्र आहेत. बावीस डिसेंबरला पहिल्या फेरीसाठी प्रवर्गानुसार उपलब्ध असणाऱ्या संस्थानुसार जागांचा तपशील जाहीर होणार आहे.

दोनच फेऱ्यांमुळे विद्यार्थ्यांना विचारपूर्वक विकल्प भरावे लागणार आहेत. पहिल्या फेरीला पूर्वीसारखाच पहिला विकल्प सक्तीच आहे. चार जानेवारीपासून नियमित वर्गांना प्रारंभ होणार आहे.

| फेरीचे स्वरूप | कालावधी |
|---|---|
| पहिली विकल्प फेरी | २३ ते २५ डिसेंबर |
| पहिली विद्यार्थ्यांची यादी | २८ डिसेंबर |
| संस्था प्रवेशासाठी मुदत | २९ ते ३१ डिसेंबर |
| दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील | १ जानेवारी |
| दुसरी विकल्प फेरी | २ ते ४ जानेवारी |
| दुसरी यादी | ६ जानेवारी |
| संस्था प्रवेशासाठी मुदत | ७ ते ९ जानेवारी |

# समाजपरिवर्तनात शांतिसागर महाराजांची विचार महत्त्वाचे

## शशिकांत राजोना : चर्चासत्राचा समारोप

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोणत्याही समाज परिवर्तनात वैचारिक भूमिका महत्त्वाची असते. प्रथमाचार्य शांतिसागर महाराज यांनी ते पदोपदी घेतली, अशा शब्दांत वीर सेवा दल मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष शशिकांत राजोना यांनी बुधवारी शांतिसागर महाराजांच्या कार्याला उजाळा दिला.

दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये महावीर अध्यासन केंद्रातर्फे आयोजित 'मानवतेचा दीपस्तंभ शांतिसागर महाराज' या दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी 'अण्णासाहेब लठ्ठे फौंडेशन'च्या स्थापनेची अधिकृत घोषणा करण्यात आली.

राजोना म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विद्यापीठ महावीरांच्या विचारांना प्राधान्य देते, ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे नमूद केले.

दरम्यान, दिवसभर झालेल्या चर्चासत्रात 'सल्लेखना' या विषयावर डॉ. धुरंधर चौगुले, 'विहार' या विषयावर डॉ. पद्मजा पाटील यांनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. डी. ए. पाटील यांनी अण्णासाहेब लठ्ठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. महावीर अध्यासन केंद्राचे समन्वयक विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. संदीप पाटील यांनी आभार मानले.

# शांतिसागर महाराज मानवतेचा दीपस्तंभ

## आ. आवाडे; विद्यापीठातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रथमाचार्य शांतिसागर महाराज मानवतेचा दीपस्तंभ आहेत, असे प्रतिपादन आ. प्रकाश आवाडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनमार्फत प्रथमाचार्य शांतिसागर महाराज मुनीदीक्षा शताब्दीनिमित्त राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. अध्यक्षीय मनोगतात डॉ. शिर्के म्हणाले, चर्चासत्राच्या माध्यमातून अभ्यास व संशोधन यावर चर्चा झाली, हे महत्त्वाचे आहे. भगवान महावीर अध्यासन केंद्र संशोधनात भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनमार्फत शांतिसागर महाराज मुनीदीक्षा शताब्दीनिमित्त राष्ट्रीय चर्चासत्र उद्घाटनप्रसंगी बोलताना आ. प्रकाश आवाडे. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जे. एफ. पाटील आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

याप्रसंगी लठ्ठे फाऊंडेशनचे उद्घाटन झाले. शाहू महाराजांचा समतेचा विचार व समाज प्रबोधन आचार्य शांतिसागर महाराज यांनी ३० हजार कि.मी.च्या पायी प्रवासातून प्रस्थापित केले. या निमित्त लठ्ठे फाऊंडेशनतर्फे महावीर अध्यासनास संशोधन शिष्यवृत्ती व एक लाख रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली. आ. आवाडे यांनी लठ्ठे यांच्या जीवनावर अभ्यास शिष्यवृत्ती, पीएच. डी. संपादन करणाऱ्या पहिल्या दोन अभ्यासकांना प्रत्येकी ५१ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

यावेळी उद्योगपती सुरेंद्र जैन, हेमंत लडके, संजय शेटे, सुरेश रोटे, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ.बी.डी. खणे, डॉ. पद्मजा पाटील, प्रा.डॉ. डी. ए. पाटील, विमल पाटील प्राचार्य श्रीधर हेरवाडे, डॉ. रावसाहेब पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले. सूत्रसंचालन एस. डी. पाटील यांनी केले. सुरेश रोटे यांनी आभार मानले.

# पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या लेखी पुनर्परीक्षा १५ डिसेंबरपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्षास प्रवेशित व बॅकलॉग असलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत लेखी पुनर्परीक्षा १५ ते ३१ डिसेंबर कालावधीत महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत.

उन्हाळी २०२० मधील अंतिम वर्षास प्रवेशित व अनुशेष (बॅकलॉग) असलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा ऑक्टोबरमध्ये महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर घेतल्या आहेत. परंतु, परीक्षेच्या कालावधीत काही विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा, कोव्हिड-१९ प्रादुर्भाव, गैरहजर अथवा तांत्रिक कारणांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता आले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा घेण्याबाबत परीक्षा विभागाने अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार परीक्षा विषम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत निश्चित केलेल्या धोरणानुसार समन्वयक, अग्रणी महाविद्यालय, विद्यापीठ अधिविभाग स्तरावर घेण्यात याव्यात.

कोरोनाबाबत शासकीय नियमांनुसार योग्य ती कार्यवाही करावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

# महावीर अध्यासनास लठ्ठे फौंडेशनतर्फे एक लाखांची देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापिठाच्या भगवान महावीर अध्यासनतर्फे प्रथमाचार्य शांतीसागर महाराज यांच्या मुनीदिशा शताब्दीनिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चाचत्राचे उद्‌घाटन आमदार प्रकाश आवाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लठ्ठे फौंडेशनचे उद्‌घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित लठ्ठे फौंडेशनच्यावतीने महावीर अध्यासनास संशोधन शिष्यवृती तसेच एक लाख रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रा. डी. ए. पाटील लिखित 'शांतीसागर महाराज जिवन चरित्र' तसेच भारती उपाध्ये लिखित 'आत्मसंस्कार' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. व्ही. बी. कक्कडे, आभार सुरेश रोटे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, उद्योजक सुरेंद्र जैन, हेमंत लठ्ठे, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, एन. एन. पाटील, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. रावसाहेब पाटील, संजय शेटे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात विद्यापरिषदेची आज बैठक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापरिषदेची आज बैठक होणार आहे. या बैठकीत विविध अभ्यासक्रम सुरू करणे, नवीन उपक्रमांना मान्यता दिली जाणार आहे. तसेच नवीन ३ ते ४ महाविद्यालयांना मान्यता मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विद्यापीरषदेच्या बैठकीकडे विद्यापीठ परिक्षेत्राचे लक्ष लागले आहे. या बैठकीसाठी विद्यापरिषदेचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

# आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापनेचे विधेयक आणणार

**मुंबई :** राज्यात आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यासाठीच्या प्रारूप विधेयकास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या विद्यापीठाच्या स्थापनेची घोषणा केली होती. हे विधेयक विधिमंडळाच्या अधिवेशनात सादर करण्यात येईल. या क्रीडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आवश्यक अधिनियम प्रारूप तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सादर केलेले अधिनियम प्रारूप विधेयकविधि व न्याय विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आले होते.